1. कार्यकारी सारांश

प्रस्तावना

1.1 एटीआयएल (पूर्वी अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड म्हणून प्रसिध्द असणाऱ्या) (पारेषण व्यवसाय असणाऱ्या) कंपनीला महाराष्ट्र विद्‌युत नियामक आयोग (यापुढे 'सम्माननीय आयोग' किंवा 'एमईआरसी' म्हणून उल्लेख असणारे) यांनी वर्ष 2008 च्या प्रकरण क्र. 138 वरील आदेश दिनांकीत 06.07.2009 द्वारे वर्ष 2009 चा पारेषण परवाना क्र. 2 बहाल केला होता. आयोगाने आपला आदेश दिनांकीत 30.03.2011 द्वारे कथित परवान्यामध्ये दुरूस्ती केली होती. त्यानंतर एपीएमएलच्या इतर उद्योगांकडून परवानाधारक पारेषण व्यवसायाला नियंत्रण घालण्यासाठी एपीएमएल-टी यांनी आपला पारेषण परवाना एटीआयएलच्या नावे करण्यासाठी याचिका सादर केली. वर्ष 2014 च्या प्रकरण क्र. 189 वरील आदेश दिनांकीत 8.12.2014 द्वारे आयोगाने वर उल्लेख केलेला परवाना एटीआयएलच्या नावे करण्यास मंजुरी दिली. तिरोडा सबस्टेशन येथील संबंधित बेजसह 2X80 एमव्हीएआर बस रिॲक्टर समाविष्ट करण्यासाठी वर्ष 2014 च्या प्रकरण क्र. 136 वरील आदेश दिनांकीत 09.07.2015 द्वारे एमईआरसीने कथित परवान्यामध्ये अधिक दुरूस्ती केली.

वैधानिक तरतुदी

1.2 याचिकाकर्ते हे पारेषण परवानाधारक असल्यामुळे निर्देशित नियामक कार्यपद्धती अंतर्गत कामकाज करण्यात प्रयत्न करतात. पारेषण व्यवसायाचे खालील कायदे, धोरणे व नियमावल्या यांचा अंतर्गत अनुशासन व नियमन होते:

- विद्‌युत कायदा 2003;
- राष्ट्रीय विद्‌युत धोरण;
- राष्ट्रीय टॅरिफ पॉलिसी; आणि
- एमईआरसी (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स, 2019 आणि
- एमईआरसी (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स, 2024

1.3 सन्माननीय आयोगाने विद्‌युतनिर्मिती, पारेषण व वितरण यांचे टॅरिफ निश्चित करण्यासाठी 19.08.2024 रोजी एमवायटी रेग्युलेशन्स, 2024 निर्देशित केले आहेत.

(ए) महाराष्ट्र विद्‌युत नियामक आयोग (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स, 2019 अंतर्गत करण्यात यावयाचे वित्तिय वर्ष 2022-23 आणि वित्तिय वर्ष 2023-24 यांचे ट्रुईंग अप:
(बी) महाराष्ट्र विद्‌युत नियामक आयोग (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स 2019 अंतर्गत करण्यात यावयाचे वित्तिय वर्ष 2024-25 चे तात्पुरते ट्रुईंग अप;
(सी) या नियमांतर्गत नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षात एकूण महसुलाची आवश्यकता;

1.4 वरील गोष्टी विचारात घेता एटीआयएल पुढील गोष्टी सादर करीत आहे:

(ए) एमवायटी रेग्युलेशन्स, 2019 च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष 2022-23 आणि 2023-24 यांच्या एआरआरच्या ट्रु-अपसाठी याचिका.

(बी) एमवायटी रेग्युलेशन्स, 2019 च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष 2024-25 च्या एआरआरच्या तात्पुरत्या ट्रु-अपसाठी याचिका.

(सी) एमवायटी रेग्युलेशन्स, 2024 च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष 2025-26 ते वित्तिय वर्ष 2029-30 साठी एआरआरचा अंदाज.

ट्रु-अप, तात्पुरता ट्रु-अप आणि एआरआरच्या अंदाजाच्या हिशेबासाठी आधार

1.5 तीनही शिल्लक असलेल्या अपिलांचे निकाल विचारात न घेता, सन्माननीय आयोगाने वर्ष 2022 च्या प्रकरण क्र. 238 बाबत 31 मार्च 2023 रोजी वित्तिय वर्ष 2021-22 साठी मंजूर केलेल्या समाप्तीच्या भांडवल खर्चाच्या आधारे याचिकाकर्त्यांने वित्तिय वर्ष 2022-23, आणि वित्तिय वर्ष 2023-24 साठी एआरआरचे ट्रु अप, वित्तिय वर्ष 2024-25 च्या आणि हंगामी एआरआरचे तात्पुरते ट्रु अप आणि वित्तिय वर्ष 2025-26 आणि वित्तिय वर्ष 2029-30 यांचे सुधारीत एआरआर निश्चित केले आहेत. एटीआयएलचे वित्तिय वर्ष 2022-23 आणि वित्तिय वर्ष 2023-24 चे लेखापरीक्षित वार्षिक लेखा **अनुक्रमे परिशिष्ट 1 आणि परिशिष्ट 2** मध्ये सादर करण्यात आले आहेत. एटीआयएल (एमईआरसी ॲसेट्स) चे वित्तिय वर्ष 2022-23 आणि वित्तिय वर्ष 2023-24 चे लेखापरीक्षित वार्षिक लेखा **अनुक्रमे परिशिष्ट 3 आणि परिशिष्ट 4** मध्ये सादर करण्यात आले आहेत.

1.6 याचिकाकर्ता यांनी खालील पद्धतीने ट्रू-अप, हंगामी ट्रू-अप आणि एआरआरचा अंदाज तयार केला आहेः

(ए) एमवायटी रेग्युलेशन्स 2019 आणि इतर रेग्युलेशन्स यांच्या अनुसार सन्माननीय आयोगाने सन 2022 चे प्रकरण क्र. 238 यासाठी 31 मार्च 2023 या तारखेस वित्तिय वर्ष 2021-22 साठी मंजूर केलेल्या शेवटच्या भांडवली खर्चाच्या आधारे वित्तिय वर्ष 2022-23, आणि वित्तिय वर्ष 2023-24 यांच्या एआरआरचे ट्रु अप.

(बी) सन्माननीय आयोगाने वर्ष 2022 च्या प्रकरण क्र. 238 साठी 31 मार्च 2023 या तारखेस वित्तिय वर्ष 2021-22 साठी मंजूर केलेल्या समाप्तीचा भांडवली खर्च आणि वित्तिय वर्ष 2022-23 आणि वित्तिय वर्ष 2023-24 साठी अतिरिक्त भांडवली खर्च आणि एमवायटी रेग्युलेशन्स 2019 च्या तरतुदी व इतर रेग्युलेशन्स यांच्या आधारे वित्तिय वर्ष 2024-2025 च्या एआरआरचे तात्पुरते ट्रु अप.

(सी) एमवायटी रेग्युलेशन्स 2019 च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष 2022-23, 2023-24 आणि 2024-25 साठी महसुली तफावत/(वृध्दी) निश्चित करण्यात आली आहे.

(डी) वित्तिय वर्ष 2025-26 दरम्यान वसुलीसाठी वहन खर्च पुढीलप्रमाणे आहे:

- वित्तिय वर्ष 2022-23 मधील वसुलीला मंजुरी देण्यासाठी झालेल्या विलंबामुळे नफा (तोटा) यांची जुळवणी केल्यानंतर मंजूर झालेला एआरआर आणि वास्तविक महसुली आवश्यकता यांच्यामधील फरकासाठी वहन खर्च (कॅरींग कॉस्ट).
- वित्तिय वर्ष 2023-24 मधील वसुलीला मंजुरी देण्यासाठी झालेल्या विलंबामुळे नफा (तोटा) यांची जुळवणी केल्यानंतर मंजूर झालेला एआरआर आणि वास्तविक महसुली आवश्यकता यांच्यामधील फरकासाठी वहन खर्च (कॅरींग कॉस्ट).

(ई) एमवायटी रेग्युलेशन्स 2024 व इतर रेग्युलेशन्स यांच्या अनुसार वित्तिय वर्ष 2025-26 ते वित्तिय वर्ष 2029-30 साठी सुधारीत एआरआर.

1.7 याचिकाकर्त्यांनी वर्ष 2017 च्या प्रकरण क्र. 170 साठी वरील सन्माननीय आयोगाच्या 12.09.2018 या तारखेच्या आदेशाला आव्हान देत सन्माननीय एपीटीइएल यांच्या समक्ष एक अपील दाखल केले आहे. हे अपील सन्माननीय एपीटीइएल यांनी वर्ष 2018 चे अपील क्र. 402 म्हणून नोंदविलेले आहे.

1.8 वर्ष 2019 च्या प्रकरण क्र. 289 बाबत सन्माननीय आयोगाच्या 30.03.2020 तारखेच्या आदेशामुळे नाराज झालेल्या याचिकाकर्त्याने वर्ष 2020 चे अपील क्र. 154 म्हणून नोंदणी झालेले अपील सम्माननीय एपीटीइएल यांच्या समक्ष दाखल केलेले आहे.

1.9 याचिकाकर्ता यांनी 2022 ची प्रकरण क्र. 238 साठी वरील सन्माननीय आयोगाच्या 31.03.2023 या तारखेच्या आदेशाला आव्हान देणारी याचिका माननीय एपीटीइएल यांच्यासमोर सादर केली आहे. माननीय एपीटीइएल यांच्यासमोर अपील क्रमांक 649/2023 या क्रमांकाने सदर अपीलाची नोंदणी करण्यात आली आहे.

1.10 याचिकाकर्त्यांना असे नमूद करावयाचे आहे की याचिकाकर्त्यांनी ही याचिका वर उल्लेख केलेल्या अपीलांबाबत सन्माननीय एपीटीइएल यांच्या आदेशामधून निर्माण होणाऱ्या त्यांच्या अधिकारावर परिणाम होणारे नाही अशा प्रकारे दाखल केली आहे.

1.11 वरील बाबी विचारात घेता वित्तिय वर्ष 2022-23 साठी याचिकाकर्त्याचा ट्रुड अप एआरआर खालील कोष्टकामध्ये मांडण्यात आला आहे:

कोष्टक 1-1: वित्तिय वर्ष 2022-23 साठी एआरआरचे ट्रु अप (रु. कोटी)

अनु क्र.	तपशील	प्रकरण 238 सन 2022 दिनांकीत 31.03.2023	सुधारीत नॉर्मेटिव्ह/ प्रत्यक्ष	प्रत्यक्ष	फेरबदल	नियंत्रण करता येण्या- सारखा	नियंत्रण करता न येण्या- सारखा	लाभ/(हानी) वाटप केल्यानंतर निव्वळ देय
		ए	**बी**	**सी**	**डी = सी-ए**	**ई = डी-एफ**	**एफ = बी-ए**	**जी = ए + ई/३ + एफ**
1	कामकाज व देखभाल खर्च	13.26	13.26	13.15	(0.11)	(0.11)	-	13.19
2	घसारा खर्च	37.75	37.75	37.75	0.00		0.00	37.75
3	दीर्घकालिक कर्ज भांडवलावरील व्याज	14.68	15.98	15.98	1.30		1.30	15.98
4	खेळते भांडवळ व सिक्युरीटी डिपॉझिट्स (तारण ठेवी) वरील व्याज	2.33	2.29	-	(2.33)	(2.29)	(0.04)	0.76
5	आयकर	-	-	-	-		-	-
6	आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान	1.78	1.29	1.29	(0.49)		(0.49)	1.29
7	**एकूण महसुली खर्च**	**69.80**	**70.57**	**68.18**	**(1.62)**	**(2.39)**	**0.78**	**68.97**
8	समभाग भांडवलावरील परतावा	36.29	40.18	40.18	3.89		3.89	40.18
9	**एकंदर महसुली आवश्यकता**	**106.09**	**110.75**	**108.36**	**2.27**	**(2.39)**	**4.67**	**109.15**
10	वजा: बिगर- टॅरिफ उत्पन्न	0.86	0.47	0.47	(0.39)		(0.39)	0.47
11	वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न	-	-	-	-		-	-
12	**ट्रान्समिशन टॅरिफ कडून एकंदर महसुली आवश्यकता**	**105.23**	**110.28**	**107.89**	**2.66**	**(2.39)**	**5.06**	**108.68**

1.12 वरील बाबी विचारात घेता वित्तिय वर्ष 2023-24 साठी याचिकाकर्त्याचा ट्रुड अप एआरआर खालील कोष्टकामध्ये मांडण्यात आला आहे:

कोष्टक 1-2: वित्तिय वर्ष 2023-24 साठी एआरआरचे ट्रु अप (रु. कोटी)

अनु क्र.	तपशील	प्रकरण 238 सन 2022 दिनांकीत 31.03.2023	सुधारीत नॉर्मेटिव्ह/ प्रत्यक्ष	प्रत्यक्ष	फेरबदल	नियंत्रण करता येण्या- सारखा	नियंत्रण करता न येण्या- सारखा	लाभ/(हानी) वाटप केल्यानंतर निव्वळ देय
		ए	**बी**	**सी**	**डी = सी-ए**	**ई = डी-एफ**	**एफ = बी-ए**	**जी = ए + ई/३ + एफ**
1	कामकाज व देखभाल खर्च	13.74	13.74	13.48	(0.26)	(0.26)	-	13.57
2	घसारा खर्च	37.65	37.65	37.65	0.00		0.00	37.65
3	दीर्घकालिक कर्ज भांडवलावरील व्याज	10.08	11.00	11.00	0.92		0.92	11.00

अनु क्र.	तपशील	प्रकरण 238 सन 2022 दिनांकीत 31.03.2023	सुधारीत नॉर्मेटिव्ह/ प्रत्यक्ष	प्रत्यक्ष	फेरबदल	नियंत्रण करता येण्या-सारखा	नियंत्रण करता न येण्या-सारखा	लाभ/(हानी) वाटप केल्यानंतर निव्वळ देय
		ए	बी	सी	डी = सी-ए	ई = डी-एफ	एफ = बी-ए	जी = ए + ई/३ + एफ
4	खेळते भांडवळ व सिक्युरीटी डिपॉझिट्स (तारण ठेवी) वरील व्याज	2.45	2.61	4.39	1.94	1.78	0.16	3.20
5	आयकर	-	-	-	-		-	-
6	आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान	1.78	2.79	2.79	1.01		1.01	2.79
7	**एकूण महसुली खर्च**	**65.70**	**67.79**	**69.31**	**3.61**	**1.52**	**2.09**	**68.21**
8	समभाग भांडवलावरील परतावा	36.29	40.19	40.19	3.90		3.90	40.19
9	**एकंदर महसुली आवश्यकता**	**101.99**	**107.98**	**109.50**	**7.50**	**1.52**	**5.98**	**108.39**
10	वजा: बिगर- टॅरिफ उत्पन्न	0.98	0.86	0.86	(0.12)		(0.12)	0.86
11	वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न	-	-	-	-		-	-
12	**ट्रान्समिशन टॅरिफ कडून एकंदर महसुली आवश्यकता**	**101.01**	**107.12**	**108.64**	**7.62**	**1.52**	**6.10**	**107.53**

1.13 याचिकाकर्ता आपले ध्यान एमवायटी रेग्युलेशन 2019 च्या रेग्युलेशन क्र. 29.7 कडे वेधू इच्छीतात, ज्यामध्ये अशी तरतूद आहे की पारेषणाची उपलब्धता असल्यास इक्विटीच्या परताव्यावर अतिरिक्त/वाढीव दर दिला जाऊ शकेल. ही बाब विचारात घेऊन याचिकाकर्त्याने वित्तिय वर्ष 2022-23 आणि वित्तिय वर्ष 2023-24 साठी अनुक्रमे 99.88% आणि 99.84% एवढी पारेषण उपलब्धता प्राप्त केली आहे आणि त्यानुसार इक्विटीच्या परताव्यावर वाढीव दराची मागणी केली आहे. एमएसएलडीसी यांच्याकडून याचिकाकर्त्याला वित्तिय वर्ष 2022-23 आणि वित्तिय वर्ष 2023-24 साठी देण्यात आलेले वार्षिक उपलब्धता प्रमाणपत्र या याचिकेसोबत **परिशिष्ट 4** म्हणून जोडलेले आहे. वित्तिय वर्ष 2022-23 आणि वित्तिय वर्ष 2023-24 च्या एआरआरच्या ट्रू-अप चा समरी खालील तक्त्यात देण्यात आला आहे:

कोष्टक 1-3: वित्तिय वर्ष 2022-23 आणि वित्तिय वर्ष 2023-24 साठी ट्रु अप समरी (रु. कोटी)

अनु क्र.	तपशील	सूत्र	वित्तिय वर्ष 2022-23 साठी प्रत्यक्ष	वित्तिय वर्ष 2023-24 साठी प्रत्यक्ष
1	ट्रुईंग अप नंतर आणि नफा/तोटा यांचे वाटप झाल्यावर परवानगी असणारा एआरआर	ए	108.68	107.53
2	एमवायटी आदेश प्रकरण 290 सन 2019 मध्ये आणि एमटीआर आदेश प्रकरण क्र. 238 सन 2022 मंजूर केलेली आधीच्या कालावधींची तफावत	बी	25.96	39.93
3	**ट्रुईंग अप नंतर आणि नफा/तोटा व आधीची वसुली यांचे वाटप झाल्यावर परवानगी असणारा एआरआर**	**सी = ए+बी**	**134.64**	**147.46**
4	वजा : इन एसटीएस आदेशानुसार महसूल	डी	131.03	140.94
5	**वहन खर्च/(धारणा) खर्च याच्या हिशोबासाठी महसुलातील तफावत/ (वृध्दी)-**	**ई = सी -डी**	**3.61**	**6.52**

अनु क्र.	तपशील	सूत्र	वित्तिय वर्ष 2022-23 साठी प्रत्यक्ष	वित्तिय वर्ष 2023-24 साठी प्रत्यक्ष
6	2022 ची प्रकरण क्र. 238 च्या आदेशात हंगामी ट्रू-अपची वसुली करण्याची परवानगी देण्यात आली आहे	एफ	0.16	
7	महसुलातील तफावत/(वाढ) यामुळे वहन / (धारणा) खर्च	जी	1.07	1.35
8	**वहन खर्च आणि उपलब्धता इन्सेन्टिव्ह यांच्या समावेशासह वसुल करावयाची निव्वळ महसुल तफावत**	**एच = ई - एफ +जी**	**4.52**	**7.88**

1.14 वित्तिय वर्ष 2024-25 च्या बाबतीत एटीआयएल यांनी एमवायटी आदेशामधील मंजुर झालेल्या एआरआरची दुसऱ्या अर्धवर्षाचे अंदाज आणि अलेखापरिक्षित अर्धवार्षिक लेखा यांच्या आधारे पहिल्या अर्धवर्षाच्या प्रत्यक्ष कामगिरीबरोबर तुलना केलेली आहे. वित्तिय वर्ष 2024-25 चे मंजुर झालेले आणि सुधारीत एआरआर यांची तुलना खालील कोष्टकामध्ये करण्यात आलेली आहे:

कोष्टक क्र. 1-4: वित्तिय वर्ष 2024-25 च्या मंजूर झालेल्या व अंदाजे एआरआरची तुलना (रु. कोटी)

तपशील	वित्तिय वर्ष 2024-25		
	मंजूर (प्रकरण 238 सन 2022)	अंदाजे	तात्पुरता ट्रु-अप आवश्यकता
कार्यान्वयन व देखभाल खर्च	14.29	14.29	-
घसारा खर्च	37.65	37.65	(0.00)
दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज	5.49	5.98	0.49
खेळते भांडवल आणि ग्राहकांचे सिक्युरीटी डिपॉझिट यावरील व्याज	2.43	2.69	0.26
आयकर	-		-
आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान	1.78	1.78	0.00
एकूण महसुली खर्च	**61.64**	**62.39**	0.75
समभाग भांडवलावरील परतावा	36.29	36.30	0.01
एकंदर महसुली आवश्यकता	**97.93**	**98.69**	**0.76**
वजा: बिगर-टॅरिफ उत्पन्न	1.10	1.09	(0.01)
वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न	-		-
पारेषण टॅरिफपासून एकंदर महसुली आवश्यकता	**96.83**	**97.60**	**0.77**

कोष्टक 1-5: वित्तिय वर्ष 2024-25 साठी तात्पुरता ट्रु अप (रु. कोटी)

अनु क्र.	तपशील	सूत्र	तात्पुरता वित्तिय वर्ष 2024-25
1	ट्रुईंग अप नंतर आणि नफा/तोटा यांचे वाटप झाल्यावर परवानगी असणारा एआरआर	ए	97.60
2	एमटीआर आदेश प्रकरण 238 सन 2022 मध्ये मंजूर केलेली आधीच्या कालावधींची तफावत	बी	42.72
3	**ट्रुईंग अप नंतर आणि नफा/तोटा व आधीची वसुली यांचे वाटप झाल्यावर परवानगी असणारा एआरआर**	**सी= ए+बी**	**140.32**
4	वजा: इन एसटीएस आदेशानुसार महसूल	डी	139.55
5	**वहन खर्च / (धारणा) खर्च याच्या हिशोबासाठी महसुलातील तफावत / (वृध्दी)**	**ई= सी- डी**	**0.77**

1.15 वर्तमान याचिकेमध्ये याचिकाकर्त्यांने वित्तिय वर्ष 2024-25 साठी कोणत्याही वहन खर्चाबाबत दावा केलेला नाही.

1.16 वित्तिय वर्ष 2025-26 ते वित्तिय वर्ष 2029-30 साठी एआरआरचे सुधारीत अंदाज खालील कोष्टकांमध्ये देण्यात आलेले आहेत:

कोष्टक 1-6: वित्तिय वर्ष 2025-26 ते वित्तिय वर्ष 2029-30 मधील एकूण महसुलाची आवश्यकता (रु. कोटी)

तपशील	वित्तिय वर्ष 2025-26	वित्तिय वर्ष 2026-27	वित्तिय वर्ष 2027-28	वित्तिय वर्ष 2028-29	वित्तिय वर्ष 2029-30
कार्यान्वयन व देखभाल खर्च	14.91	15.59	16.29	17.02	17.81
घसारा खर्च	38.03	7.18	7.18	7.18	7.18
भांडवली कर्जावरील व्याज	1.85	0.10	-	-	-
खेळत्या भांडवलावरील व्याज	2.33	1.77	1.78	1.80	1.81
आयकर					
आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान	1.78	1.83	1.83	1.83	1.83
एकूण महसुली खर्च	**58.91**	**26.48**	**27.09**	**27.83**	**28.63**
अधिक: समभाग भांडवलावरील परतावा	40.72	41.26	41.26	41.26	41.26
एकंदर महसुली आवश्यकता	**99.63**	**67.73**	**68.34**	**69.08**	**69.89**
वजा: बिगर टॅरिफ उत्पन्न	1.19	1.29	1.40	1.50	1.60
वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न					
वजा: ओपन ॲक्सेस चार्जेसपासून उत्पन्न					
पारेषणाकडून एकंदर महसुली आवश्यकता	**98.44**	**66.44**	**66.95**	**67.58**	**68.29**

1.17 याचिकाकर्त्याला असे निवेदन करावयाचे आहे की वित्तिय वर्ष 2025-26 ते वित्तिय वर्ष 2029-30 चा संचित एआरआर (महसुली तफावत/(नफा) यांचा समावेश असणारा) खालीलप्रमाणे आहे:

कोष्टक 1-7: वित्तिय वर्ष 2025-26 ते वित्तिय वर्ष 2029-30 साठी संचित एआरआर (रु. कोटी)

अनु क्र.	तपशील	वित्तिय वर्ष 2025-26	वित्तिय वर्ष 2026-27	वित्तिय वर्ष 2027-28	वित्तिय वर्ष 2028-29	वित्तिय वर्ष 2029-30
1	विद्यमान याचिकेत एआरआरचा अंदाज	98.44	66.44	66.95	67.58	68.29
2	वित्तिय वर्ष 2022-23 साठी महसुली तफावत / (वृध्दी)	3.45				
3	वित्तिय वर्ष 2022-23 च्या महसुली तफावत / (वृध्दी) वरील वहन खर्च	1.07				
4	वित्तिय वर्ष 2023-24 साठी महसुली तफावत / (वृध्दी)	6.52				
5	वित्तिय वर्ष 2023-24 च्या महसुली तफावत / (वृध्दी) वरील वहन खर्च	1.35				
6	वित्तिय वर्ष 2024-25 साठी महसुली तफावत / (वृध्दी)	0.77				
7	**इन एसटीएस मार्फत एकूण अंदाजे वसुली**	**111.61**	**66.44**	**66.95**	**67.58**	**68.29**

सन्माननीय आयोगाकडे प्रार्थना

वरील वस्तुस्थिती आणि परिस्थिती विचारात घेऊन सन्माननीय आयोगाने पुढील गोष्टी कराव्यात अशी प्रार्थना याचिकाकर्ता करीत आहे:

(ए) वर्तमान याचिका दाखल करून घेणे.

(बी) ह्या याचिकेमध्ये दावा केलेला अतिरिक्त भांडवली खर्च मंजुर करण्यात यावा.

(सी) वित्तिय वर्ष 2022-23 आणि वित्तिय वर्ष 2023-24 साठी इक्विटीवरील अतिरिक्त परतावा आणि वहन खर्च यांच्यासह एआरआरच्या ट्रु अपला मंजुरी.

(डी) या याचिकेमध्ये सूचित केल्यानुसार वित्तिय वर्ष 2024-25 च्या एआरआरच्या तात्पुरत्या ट्रु-अपला मंजुरी देणे.

(ई) या याचिकेमध्ये सूचित केल्यानुसार वित्तिय वर्ष 2025-26 ते वित्तिय वर्ष 2029-30 च्या सुधारीत एआरआर प्रक्षेपणांना मंजुरी देणे.

(एफ) लागू होणाऱ्या वहन खर्चासह वरील विनंतीच्या प्रभावाची वसुली टीएसयूज्कडून करण्यास परवानगी देणे.

(जी) अनवधानाने कोणत्याही त्रुटी/चुका/कमतरता राहून गेल्या असल्यास त्यांना क्षमा करणे आणि पुढील तारखेस आवश्यकता वाटेल त्यानुसार या सादरीकरणामध्ये वाढ/बदल/दुरुस्ती/फेरफार करण्यासाठी व त्यानंतर पुन्हा ती सादर करणे यासाठी एटीआयएल यांना परवानगी देणे.

(एच) सन्माननीय आयोगाला देण्यास योग्य वाटेल अशी इतर कोणतीही सूट, आदेश किंवा निर्देश देण्यास परवानगी देणे.

(आय) या प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती लक्षात घेऊन सन्माननीय आयोगाला उचित आणि योग्य वाटतील अशाप्रकारे यापुढील आदेश मंजूर करणे.